CMYK


महापरिनिर्वाण दिनासाठी चैत्यभूमीवरील सुविधांची कोकण विभागीय आयुक्तांकडून पाहणी >> पान 2

समीर भुजबळांनंतर सुहास कांदेंचं नेक्स्ट टार्गेट छगन भुजबळ? >> पान 3

शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारची 'ॲग्रिस्टॅक' योजना >> पान 4


**सुविचार**

अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




श्रद्धा कपूरने जुहूमध्ये भाड्याने घेतलं आलिशान अपार्टमेंट आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 114 ■ बुधवार, दि. 04 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# महायुती सरकारच्या शपथविधीची लगबग

## आझाद मैदानावर जोरदार तयारी; पंतप्रधान मोदी, २२ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह संत-महंतही राहणार हजर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. आता महायुतीच्या सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पाच डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर पार पडणार आहे. या सोहळ्याची सध्या जोरदार तयारी केली जात आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह १९ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.



महायुतीच्या शपथविधी सोहळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, सुशिलकुमार शिंदे यांना देखील निमंत्रीत केले जाणार आहे. तसेच १९ राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देखील उपस्थित राहणार आहेत. तर केंद्र सरकारमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले यांच्यासह महत्वाचे केंद्रातील पाच मंत्री देखील या सोहळ्याला हजेरी लावणार आहेत.

**'या' नेत्यांना शपथविधीचे आमंत्रण**

योगी आदित्यनाथ – मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश, चंद्राबाबू नायडू – मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश, नितीन कुमार – मुख्यमंत्री, बिहार, प्रेमा खांडू – मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश, हिमंत बिश्र्व शर्मा – मुख्यमंत्री, आसाम, विष्णूदेव साय – मुख्यमंत्री, छत्तीसगढ, प्रमोद सावंत – मुख्यमंत्री, गोवा, भूपेंद्र पटेल – मुख्यमंत्री, गुजरात, नायब सिंह सैनी – मुख्यमंत्री, हरियाणा, मोहन यादव – मुख्यमंत्री, मध्य प्रदेश

कॉनराड संगमा – मुख्यमंत्री, मेघालय, भजनलाल शर्मा – मुख्यमंत्री, राजस्थान, मानिक साहा – मुख्यमंत्री, त्रिपुरा, पुष्कर सिंह धामी – मुख्यमंत्री, उत्तराखंड, देशातील संत महंतांनाही निमंत्रण, नरेंद्र महाराज नानीद , नामदेव शास्त्री, भगवानगड, राधानाथ स्वामी महाराज, इस्कॉन, गौरांगदास महाराज, इस्कॉन, जनार्दन हरीजी महाराज , प्रसाद महाराज अंमळनेरकर,महानुभाव संप्रदायाचे विध्वंस बाबा आणि मोहन महाराज, जैन मुनी लोकेश.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने 'एक है तो सेफ है'चा नारा दिला होता. आता महायुतीच्या शपथविधीतही 'एक है तो सेफ है'चा नारा दिसणार आहे. महायुतीच्या शपथविधी सोहळ्यात दहा हजार भाजप कार्यकर्ते एक है तो सेफ है, अशा आशयाचे मजकूर असलेले टी शर्ट परिधान करणार आहेत. त्यामुळे महायुतीला विजय मिळवून दिलेल्या नाऱ्याची भाजपकडून पुनरावृत्ती केली जाणार आहे. तसेच शपथविधी काळात मराठी संगीतासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.

# महायुतीचे संभाव्य खातेवाटप समोर

## भाजपला २२, शिवसेनेला १२,राष्ट्रवादी काँग्रेसला १० मंत्रिपदे; पंकजा मुंडे, बावनकुळे होणार मंत्री?

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या शपथविधीला अवघे काहीच तास शिल्लक असताना आता भाजपच्या संभाव्य मंत्रिपदाची यादी समोर आली आहे. त्यामध्ये आशिष शेलार, रविंद्र चव्हाण, गिरीश महाजन, पंकजा मुंडे यांच्यासह निलेश राणे आणि गोपीचंद पडळकरांचाही समावेश असल्याची माहिती आहे. भाजपकडून एकूण १६ मंत्री शपथ घेणार असल्याची माहिती आहे.

**भाजपचे संभाव्य मंत्री**

**कोकण**

रविंद्र चव्हाण, नितेश राणे, गणेश नाईक , मुंबई , मंगलप्रभात लोढा , आशिष शेलार , राहुल नार्वेकर , अतुल भातखळकर, (मंगलप्रभात लोढा यांना दिलं तर राहुल नार्वेकर नसतील.).

**पश्चिम महाराष्ट्र**

शिवेंद्रसिंहराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ, राधाकृष्ण विखे पाटील.

**विदर्भ**

चंद्रशेखर बावनकुळे, संजय कुटे, उत्तर महाराष्ट्र, गिरीश महाजन, जयकुमार रावल.

**मराठवाडा**

पंकजा मुंडे, अतुल सावे.

**शिवसेना संभाव्य मंत्र्यांची नावे**

१) एकनाथ शिंदे, २) दादा भुसे, ३) शंभूराज देसाई, ४) गुलाबराव पाटील, ५) अर्जुन खोतकर ६) संजय राठोड, ७) उदय सामंत.

गेल्या काही तासांपासून एकनाथ शिंदे यांनी महायुतीसाठी चर्चेचे दरवाजे पुन्हा उघड केले आहेत. त्यामुळे वर्षा बंगल्यावरील घडामोडींना वेग आला आहे. काहीवेळापूर्वीच संजय शिरसाट हे उदय सामंत यांच्या मुक्तागिरी बंगल्यावर पोहोचले आहेत. तिथून हे दोन्ही नेते वर्षा बंगल्यावर जातील. तर दुसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर दाखल झाले आहेत. बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी प्रदेश मुख्यालयात शपथविधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेतला होता. प्रदेश मुख्यालयातील बैठकीनंतर फडणवीस यांच्या भेटीसाठी बावनकुळे दाखल झाले आहेत.

महायुतीच्या शपथविधीतही 'एक है तो सेफ है'चा नारा दिसणार आहे. महायुतीच्या शपथविधी सोहळ्यात दहा हजार भाजप कार्यकर्ते 'एक हैं तो सेफ हैं आशयाचा मजकूर असलेले टी शर्ट परिधान करणार आहेत. महायुतीला विजय मिळवून दिलेल्या नाऱ्याची भाजपकडून पुनरावृत्ती करण्यात येणार आहे. तसेच शपथविधी काळात मराठी संगीतासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, शिवसेनेच्या मंत्रिपदाची संभाव्य यादीही समोर आली असून त्यामध्ये स्वतः एकनाथ शिंदे यांच्यासह उदय सामंत यांचे नाव आहे.

# शिंदेंच्या शरीरावर ताण असतानाही त्यांची सरकार स्थापनेसाठी धडपड; किरीट सोमय्या यांची माध्यमांशी बोलताना माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शरीरावर ताण अतसानाही त्यांची सरकार स्थापनेसाठी धडपड सुरू आहे. अशी माहिती भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत प्रचारामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर ताण आला होता, पण महायुतीचे सरकार पुर्नस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ते उपचार घेऊन बरे होतील आणि मैदानात येतील.आपण सगळी माणसे आहोत. शिंदेंवर प्रचाराचा ताण आला त्यामुळे ते आजारी पडले. सरकार प्रोटोकॉलनुसार काम करते त्यामुळे सरकार संबंधीत सगळ्यांना निमंत्रण दिले आहे. एकनाथ शिंदे यांच्या प्रकृती संबंधात कोणीही वेगळी भाषा वापरु नये, त्यांच्या शरीरावर ताण असतानाही ते सरकार स्थापनेसाठी धडपड करत आहेत. ते लवकरच बरे होतील. तर नाना पटोले यांच्या आरोपाबाबत बोलताना म्हणाले की,डॉ.बाबासाहेबांची घटना स्वीकारलेली आहे आणि त्याप्रमाणे निवडणूक आयोग सिक्रेट पद्धतीने मतदान घेत आहे. केंद्रीय निवडणूक आणि राज्यस्तरावर,स्थानिक स्वराज्य संस्था,ग्रामपंचायतींच्या निवडणूका होतात. त्यात काही त्रुटी आढळ्यास निवडणूक आयोगाकडे जाऊ शकतो, नाना पटोले आज बैठकीला जात आहेत. त्यांना निवडणूक आयोगाने बोलावले आहे. जर काही पुरावे असतील तर त्यांनी निश्र्चितपणे द्यावे. या सगळ्यामध्ये महाविकास आघाडी सुप्रीम कोर्टात देखील जाऊन आली त्यांनी सुद्धा त्यांना आरसा दाखवला. लोकसभेत जिंकलात तेव्हा ईव्हीएम चांगले होते.अशी उपरोधिक टिकाही भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला.



# शिंदे गृहखात्यावर ठाम, महसूल आणि सार्वजनिक बांधकाम खातंही मागितलं

दैनिक आपला विदर्भ

## शिंदे-फडणवीसांच्या बैठकीत तोडगा नाहीच

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारचा शपथविधी अवघ्या काही तासांवर आला असला तरी मंत्रिमंडळाच्या काही खात्यांवरून मात्र अद्याप तोडगा निघाला नाही. एकनाथ शिंदे यांनी गृहखाते, नगरविकास खात्यासह महसूल आणि सार्वजनिक बांधकाम खातंही शिवसेनेकडे मागितलं असल्याची माहिती आहे. त्याचवरून भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील वर्षा बंगल्यावरील बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही. त्यावर बुधवारी पुन्हा एकदा चर्चा होणार असून अंतिम तोडगा निघण्याची शक्यता आहे.

भाजपला मुख्यमंत्रिपद दिल्यानंतर आता एकनाथ शिंदे हे शिवसेनेला गृहखातं आणि नगरविकास खातं मिळावं अशी मागणी करत आहेत. त्याचसोबत महसूल खातं आणि सार्वजनिक बांधकाम खातंही शिवसेनेकडे राहावं यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदे हे आजारी असल्याने महायुतीची कोणतीही बैठक होऊ शकली नाही. त्याचमुळे मंत्रिमंडळातील कोणती खाती कुठल्या पक्षाला याचा निर्णयही झाला नाही. आता एकनाथ शिंदे यांची तब्येत ठिक आहे. त्याचमुळे यावर तोडगा काढण्यासाठी भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस हे स्वतः शिंदेंच्या भेटीला वर्षा बंगल्यावर गेले. या दोन नेत्यांमध्ये जवळपास दीड तास चर्चा झाल्याची माहिती आहे. पण गृहखात्यावर मात्र तोडगा निघाला नाही.



गृह खाते, नगरविकास खाते शिंदेंकडे जाणार की ही खाती भाजपकडेच राहणार याचा निर्णय बुधवारी होण्याची शक्यता आहे.

महायुती सरकारच्या मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बुधवारी सकाळी जाहीर होणार आहे. भाजपच्या विधिमंडळ गटनेत्याची निवड झाल्यानंतर, बुधवारी दुपारी महायुती सरकार स्थापनेचा दावा करणार आहे. त्यानंतर बुधवारी दुपारी साडेतीन वाजता महायुतीचे नेते राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना भेटून तिन्ही नेते सरकार स्थापनेचं पत्र राज्यपालांकडे सोपवणार आहेत.

## पराभवानंतर बाळासाहेब थोरात जनतेत जाऊन झाले भावनिक



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या विधानसभा निवडनुकीतील भराभवानंतर त्यांनी आज संगमनेरात सभा घेतली व या सभेनंतर ते जनतेत जात काहिसे भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले.

आपल्या पराभव नंतर बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर येथे स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते व या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. सभा आवरल्यानंतर बाळासाहेब थोरातांनी सर्वांच्या भेटीगाठी घेत ते काहीसे भावनिक झाले होते. सभेनंतर जवळपास अर्धा तास ते आलेल्या कार्यकर्त्यांमधे जात हात मिळवत फोटो काढत होते.

## बुलढाण्यात शपथविधी सोहळ्याचे लागले बॅनर; बॅनरवर देवेंद्र फडणवीसांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचा महायुतीमध्ये अजून निर्णय झालेला नाही. याआधी देवेंद्र फडणवीस हे राज्याचे भावी मुख्यमंत्री आणि शपथविधी सोहळ्याच्या हार्दिक शुभेच्छा अशा आशयाचे बॅनर लक्ष वेधून घेत आहेत. शपथविधीपूर्वी भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बॅनर बुलढाण्यातील संगम चौकात लावण्यात आले आहेत. राज तिलक की करो तयारी आ रही है भगवाधारी असा या बॅनरवर आशय आहे.

## शरद पवार गटाचे खासदार देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला; भेटीनंतर खुद्द सुरेश म्हात्रे यांनीच सस्पेन्स संपवला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी सोमवारच्या दुपारी देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर जात भेट घेतली. सुरेश म्हात्रे हे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. मे महिन्यात झालेल्या निवडणुकीत सुरेश म्हात्रे हे कपिल पाटील यांचा पराभव करत जायंट किलर ठरले होते. मात्र, आता विधानसभेच्या निकालानंतर सुरेश म्हात्रे अचानक देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला पोहोचल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या होत्या. तर या भेटीमागील नेमकं कारण काय हे पुढे न आल्याने अनेक तर्क वितर्क देखील लावले जात होत. अशातच या भेटी मागील तपशील देत खासदार सुरेश म्हात्रे यांनी या वर स्पष्टोक्ती दिली आहे.

सोमवारच्या दुपारी देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर मी माझ्या वैयक्तिक कामासाठी भेटलो. यात कुठलाही राजकीय विषय अथवा कारण नव्हतं. राजकीय विषय असेल तर दुपारी २ वाजता गाडी घेऊन कोण जाईल का? मी इतर कोणाशीही भेटलो नाही. मात्र मिडियाने वेगवेगळे तर्क लावले आहेत. एकमेकांना भेटतो म्हणजे राजकारण असतं अस नाही. मी खासदार आहे, आमदार नाही. किंबहुना शरद पवार यांना सोडण्याचा काही प्रश्नच नाही. मी त्यांच्याच पक्षात आहे. अशी स्पष्टोक्ती देत खासदार सुरेश म्हात्रे यांनी सागर बंगल्यावरील भेटीचा सस्पेन्स संपवला आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने एकहाती सत्ता मिळवत महाविकास आघाडीला धोबीपछाड दिला होता. यानंतर आता पुढील पाच वर्षे राज्यात आणि केंद्रात महायुती आणि एनडीएची सत्ता असणार आहे. या पार्श्र्वभूमीवर आता महाराष्ट्रात नवी राजकीय समीकरणे आकाराला येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशातच सागर बंगल्यावर सोमवारी दुपारी शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी हजर झाले होते. दरम्यान, सुरेश म्हात्रे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या या भेटीचा नेमका तपशील तेव्हा समोर आला नाही. बाळ्या मामा यांनी आपण देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी आल्याचे तेव्हा सांगितले. मात्र, बाळ्या मामा आणि फडणवीसांच्या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

CMYK

## भारतीय नौदल दिन

आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्र्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्र्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वे कडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्र्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## श्रद्धा कपूरने जुहूमध्ये भाड्याने घेतलं आलिशान अपार्टमेंट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** २०१० मध्ये 'तीन पत्ती' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रद्धा कपूर आता ब्लॉकबस्टर चित्रपट देत आहेत. गेल्या १५ वर्षांपासून श्रद्धा कपूर आपल्या दमदार अभिनयाने बॉलीवूडवर अधिराज्य गाजवत आहे. अभिनेते शक्ति कपूर आणि शिवांगी कोल्हापुरी यांची ही लाडकी लेक बॉलीवूडची आघाडी अभिनेत्री झाली आहे. ऑगस्ट महिन्यात प्रदर्शित झालेल्या तिच्या 'स्त्री २' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला. ८०० कोटींहून अधिक पैसे कमावणाऱ्या 'स्त्री २' चित्रपटाच्या यशाचा आनंद श्रद्धा कपूर घेत आहे. अशातच तिने जुहूमध्ये आलिशान महागडं अपार्टमेंट भाड्याने घेतल्याचं समोर आलं आहे.

अभिनेत्री श्रद्धा कपूरने जुहूमध्ये स्वतःसाठी आलिशान अपार्टमेंट भाड्याने घेतलं आहे. ज्याचं भाडं एक किंवा दोन लाख नाही तर सहा लाख प्रतिमाह आहे. माहितीनुसार, जवळपास ३९२८.८६ स्क्वेअर फूट श्रद्धाचं अपार्टमेंट आहे. एका वर्षांसाठी तिने हे अपार्टमेंट भाड्याने घेतलं आहे. या अपार्टमेंटसाठी श्रद्धाने ॲडव्हान्स ७२ लाख रुपये दिल्याचं म्हटलं जात आहे.

श्रद्धाने स्टॅम्प ड्युटीसाठी मोजले 'इतके' हजार

जुहूमधील या अपार्टमेंटसाठी १६ ऑक्टोबरला अभिनेत्रीने करार केला. ज्यामध्ये चार गाड्यांचा पार्किंग एरिआ सामील आहे. याशिवाय श्रद्धाने ३६ हजार स्टॅम्प ड्युटी आणि १००० रुपये रजिस्ट्रेशन फी दिली आहे. पण याबाबत अद्याप श्रद्धा कपूरने स्वतः काहीही सांगितलं नाहीये.

# महापरिनिर्वाण दिनासाठी चैत्यभूमीवरील सुविधांची कोकण विभागीय आयुक्तांकडून पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून लाखो अनुयायी दादरच्या चैत्यभूमीवर येऊन अभिवादन करतात. त्यांच्यासाठी प्रशासनामार्फत विविध सोयीसुविधा चैत्यभूमी आणि परिसरात केल्या जातात. कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी या सुविधांची पाहणी करून आढावा घेतला.





विभागीय आयुक्त श्री. देशमुख म्हणाले की, चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येत असून अनुयायांसाठी वैद्यकीय कक्षही उभारण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) आणि परिसरात पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा–सुविधांबाबत सर्व यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करीत समन्वय साधून कार्यवाही करावी. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा अनुयायांना मिळतात की नाही याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी कोकण विभागीय अतिरिक्त आयुक्त विवेक गायकवाड, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहायक आयुक्त अजितकुमार आंबी, सहायक पोलीस आयुक्त प्रवीण तेजाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सर्व मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तसेच चैत्यभूमी येथे दाखल झालेल्या अनुयायांना खाद्य पदार्थांच्या किटचे वाटप करण्यात आले.

## भूक न लागणे आणि ताप हे असू शकते टायफॉइडचे लक्षण, त्वरित करा उपचार

या पावसाळ्यात विषमज्वराच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत या आजाराची प्रकरणे नोंदवली जात आहेत. सामान्यत: जास्त ताप आणि पोटदुखी ही टायफॉइडची लक्षणे असतात, परंतु भूक न लागणे हे देखील या आजाराचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, जर या वेळी तुम्हाला तापासोबत भूकही कमी लागत असेल, तर एकदा विषमज्वराची तपासणी करून घ्या.

डॉक्टरांच्या मते साल्मोनेला टायफी नावाचा जीवाणू असतो. या जीवाणूमुळे फक्त विषमज्वर होतो. ते दूषित पाण्यात आणि खराब अन्नामध्ये वाढतात. जर आपण त्यांचे सेवन केले, तर बॅक्टेरिया आपल्या शरीरात जातात आणि पोटातून आतड्यांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे आतड्यांमध्ये गंभीर संसर्ग होऊन भूकही नीट लागत नाही. काही प्रकरणांमध्ये, टायफॉइडची लक्षणे फ्लूसारखी असू शकतात.

याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले की, टायफॉइडची लक्षणे शरीरात दिसल्यास त्वरित तपासणी करावी. त्यासाठी ब्लड कल्चर आणि सीबीसी आणि सीआरपी चाचण्या केल्या जातात. ज्या व्यक्तीचा णींइ वाढला आहे, तो त्याला टायफॉइड झाल्याचे लक्षण आहे.

डॉक्टर सांगतात की विषमज्वर काही दिवसात बरा होतो, पण वेळेवर उपचार न मिळाल्यास तो गंभीर आणि जीवघेणाही ठरू शकतो. हा ताप लहान मुलांपासून कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकतो. अशा परिस्थितीत लक्षणे दिसू लागताच उपचार घेणे आवश्यक आहे.

टायफॉइडमुळे काही लोकांना उलट्या आणि जुलाब यांसारख्या समस्याही होऊ शकतात. यासोबतच जास्त ताप आहे जो १०३ अंशांपर्यंत जाऊ शकतो. टायफॉइडची ही गंभीर लक्षणे आहेत. या प्रकरणात, उपचार वेळेत केले पाहिजे.

## या संकेतांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका, नाहीतर तुम्हालाही येऊ शकतो हार्ट अटॅक

दुर्लक्ष बेतेल जीवावर...

सध्या हृद्यासंबंधित समस्या वाढताना पाहायला मिळतात. तुम्हाला याबाबत आधीच समजल्यास तुम्हाला संभाव्य हार्ट अटॅकचा धोका टाळता येऊ शकतो. पण तुमच्या हृदयातील धमन्यांमध्ये ब्लॉकेज आहे की नाही हे कसं समजू शकेल?

काही वर्षांपूर्वी असं बोललं जायचं की साधारणत: वयाच्या ५५ वर्षानंतर किंवा साठीशी व्यक्ती आला की हार्ट अटॅक किंवा हृदयासंबंधित समस्या सतावू लागतात. मात्र आता याबाबतचे ठोकताळे संपूर्णपणे बदललेले पाहायला मिळतायत. सध्याचं राहणीमान, आपल्या आहाराच्या सवयी, कामाचं टेंशन यामुळे आपल्या आरोग्यावर आणि खासकरून आपल्या हृदयावर थेट परिणाम होताना पाहायला मिळतो. आपल्यासमोर अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यामध्ये वयाच्या ३० व्या वर्षी किंवा त्याच्याही आधी हार्टफेल इन्वा हार्ट अटॅक आलेला आपल्याला माहिती असेल. यातील अनेक केसेसमध्ये हृदयातील धमन्यांमध्ये ब्लॉकेज असल्याचं खूप उशिरा समजल्याने वेळ निघून गेलेली असते.

मात्र, आपल्या धमन्यांमध्ये ब्लॉकेज तयार होतायत हे आपल्याला आधीच समजलं तर त्याचा फायदा होऊ शकतो. कोणते असे संकेत आहेत ज्यामुळे तुम्हाला तुमच्या धमन्यांमध्ये ब्लॉकेज तयार होतायत हे समजू शकेल? यासाठी सर्वात आधी जाणून घेऊयात धमन्यांमधील ब्लॉकेज नेमकं असतं तरी काय?

जेंव्हा हृदयात रक्तप्रवाह पोहोचत नाही, हृदयापर्यंत ऑक्सिजन पोहचत नाही तेंव्हा तुमच्या धमन्या ब्लॉक झाल्यात किंवा कोरोनरी आर्टरी ब्लॉकेज असल्याचं बोलू शकतो. तुमच्या धमन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल साठल्याने धमन्यांमध्ये ब्लॉकेज तयार होतात.

धमन्यांमधील ब्लॉकेजची लक्षणे काय

थकवा येऊ शकतो , चक्कर येणं, श्वास घेण्यास त्रास होणं, छातीत दुखणं, कमरेच्या खालच्या भागात दुखणे, हात पाय थंड पडणं, तुमच्या हात पायांमध्ये बधिरता येणं, स्किन पिगमेंटेशन आणि केस गळती , कोणतीही जखम लवकर भरून न निघणे

या आहेत धोक्याच्या सूचना

छातीत अचानक दुखायला लागणे, हातपाय अचानक दुखायला लागणं , श्वसनास त्रास होणं , हार्ट बिट अचानक वाढणं , मोठ्या प्रमाणात घाम येणं, घाबरल्यासारखं वाटणं , अचानक भ्रमित झाल्यासारखं वाटणं , बोलताना किंवा गिळताना त्रास होणं , शरीराच्या एका बाजूला कमजोरी येणं

भुरळ किंवा चक्कर येणं

तुमच्या धमन्यांमध्ये जखम होण्यापासून याची सुरुवात होते. तुमच्या शरीरातील इन्सुलिन रेझिस्टन्स, तुमची धूम्रपानाची सवय, उच्च कोलेस्ट्रॉल, हाय ब्लडप्रेशर किंवा तुमच्या चुकीच्या लाईफस्टाईलमुळे तुम्हला आर्टरीज ब्लॉकेज होऊ शकतात.

## दुग्धव्यवसायातून करु शकता चांगली कमाई, तुम्ही फक्त दुधापासून कमवू शकता इतके

दूध व्यवसाय सुरू करणे अगदी सोपे आहे आणि त्यात नफाही चांगला आहे. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात यासाठी समान संधी आहेत, कारण ताज्या दुधाला सर्वत्र मागणी आहे आणि पॅकेज केलेले दूध कधीही ताजे नसते.

जर तुम्हाला दुग्ध व्यवसाय सुरू करायचा असेल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की त्यासाठी योग्य नियोजन आणि कठोर परिश्रम दोन्ही आवश्यक आहेत. यानंतर दुग्ध व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते. दुग्ध व्यवसाय सुरू करण्याचा सोपा मार्ग जाणून घेऊया.



दुग्ध व्यवसाय नियोजन

सर्वप्रथम तुम्हाला दूध उत्पादन करायचे आहे की ते विकत घेऊन पुरवायचे आहे, हे ठरवा. तुमचा लक्ष्य बाजार ओळखा (जसे की घरोघरी दूध वितरण, दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा किंवा दुकाने/हॉटेलला पुरवठा). किती गुंतवणूक करावी आणि किती नफा अपेक्षित आहे याचे मूल्यांकन करा.

दुधाचे स्त्रोत निवडा

जर तुम्हाला स्वतः दूध काढायचे असेल, तर गाय किंवा म्हशीचे पालन सुरू करा. यासाठी तुम्हाला चांगल्या जातीची गाय/म्हैस खरेदी करावी लागेल. जर तुम्हाला फक्त पुरवठा करायचा असेल, तर तुम्ही स्थानिक डेअरी किंवा फार्ममधून दूध खरेदी करू शकता.

दुग्धव्यवसायासाठी लायसन्स आणि परवाना

दूध व्यवसायासाठी ऋडड–ख परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक प्रशासनाकडून आवश्यक परवानगी घ्यावी. यासाठी तुम्ही ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही अर्ज करू शकता आणि त्याची फी देखील फार जास्त नाही.

दूध साठवण आणि वाहतूक व्यवस्था

दूध ताजे आणि सुरक्षित ठेवण्यासाठी, तुम्हाला कूलिंग टँक किंवा रेफ्रिजरेटरची आवश्यकता असेल. यासाठी तुम्ही चांगल्या कंपनीची कुलिंग टँक किंवा फ्रीज खरेदी करा. असे केल्याने तुमचे दूध खराब होणार नाही. याशिवाय दुधाचा पुरवठा करण्यासाठी वाहतुकीसाठी छोट्या गाड्या आणि दुचाकींचीही आवश्यकता असते.

दुधाच्या गुणवत्तेची काळजी घ्या

डेअरी सुरू करण्यापूर्वी तुमच्या दुधाचा दर्जा बाजारात उपलब्ध असलेल्या पॅकबंद दुधापेक्षा आणि सैल दुधापेक्षा चांगला असावा हे ठरवावे. यासोबतच तुम्हाला या दुधाचा दर्जा कायम राखावा लागेल, कारण जेव्हा ग्राहक तक्रार करतात, तेव्हा ते लगेच दूध घेणे बंद करतात.

दुग्ध व्यवसायात किती नफा?

जर तुम्ही गाय किंवा म्हशीचे पालन करून दुग्ध व्यवसाय सुरू केला आणि तुमची गाय किंवा म्हैस ८ ते १० लिटर दूध देते, जे तुम्ही ५० ते ६० रुपये प्रति लिटर दराने विकले, तर तुम्हाला दरमहा १५ ते २० हजार रुपयांचा नफा मिळेल. दुसरीकडे, जर तुम्ही मध्यस्थ झालात आणि दूध विकले, तर तुम्हाला प्रति लिटर ४ रुपये नफा मिळू शकतो.

सरकारकडून मदत मिळू शकते

दुग्ध व्यवसायासाठी शासनाकडून अनुदान व कर्ज योजना उपलब्ध आहेत. तुम्ही प्रधानमंत्री रोजगार योजना किंवा दुग्धविकास कार्यक्रमाचे लाभ घेऊ शकता. दुधाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी फक्त योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि दर्जेदार सेवा आवश्यक आहेत. हा व्यवसाय तुम्हाला आर्थिकदृष्ट्या मजबूत तर बनवेलच, पण त्याचबरोबर रोजगाराच्या नवीन संधीही निर्माण करेल.

## थंडीत गिझरच्या वापरामुळे खूप बिल येते, या टिप्स वापरा होईल बचत

भारतात थंडीची लाट आली आहे. नोव्हेंबरचा महिना संपत आला नसून थंडीचा कडाका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. थंडीच्या दिवसांत थंड गोष्टीपासून दूर राहणेच सारे पसंत करतात. त्यामुळे पाण्यातही हात घालावासा वाटत नाही. आंघोळीसाठी तर या दिवसांमध्ये कडकडीत पाण्याला पसंती दिली जाते.

गरम पाण्यासाठी अनेकजण गिझरचा वापर करतात. थंडीच्या दिवसांत लोकांच्या घरांमध्ये गिझरचा वापर सर्रास केला जातो. मात्र गिझरमुळे विजेचे बिल चांगलेच वाढते. तुमच्या



घरात गिझर आहे का तसेच तुम्हीही विजेच्या वाढत्या बिलाने त्रस्त आहात का? तर आम्ही तुम्हाला देत आहोत टिप्स

कधीही गिझर सुरू ठेवू नका

गिझरचा वापर सतत करू नका. म्हणजेच जेव्हा गरज नसेल तेव्हा गिझर बंद ठेवा. गिझर खूप वेळ चालू ठेवल्यास विजेचे बिल वाढते. नव्या गिझरमध्ये ऑटो कटची सुविधा असते. मात्र तुमच्याकडे जुने गिझर असल्यास तो वेळोवेळी बंद करत राहा.

नव्या टेक्नॉलॉजीचा गिझर घ्या

सामान्यपण लोक जो गिझर लावतात तोच वर्षानुवर्षे वापरतात. जुन्या गिझरमुळे विजेचे बिल अधिक येते. यामुळे जास्त इलेक्ट्रिसिटी खर्च होते. आजकाल बाजारात नवे गिझर आहेत. सोबतच फाईव्ह स्टार रेटिंग असलेले गिझर विजेचे बील कमी करण्यास मदत करतात.

मोठ्या गिझरचा वापर

साधारणपणे जर तुम्ही छोटा गिझर वापरला तर तुम्हाला सतत पाणी गरम करावे लागते. मात्र त्याऐवजी मोठा गिझर वापरा. त्यामुळे एकदम मोठ्या प्रमाणात पाणी गरम होईल. आणि विजेचीही बचत होईल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित


## महत्त्वाचे...

### नायलॉन मांजा विक्री व वापरणाऱ्यांना कारवाई करा येवल्यात सर्वपक्षीय कृती समितीची पोलिसांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** :आगामी संक्रांत उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर येवला शहरात चोरी छुप्या पद्धतीने नायलॉन मांजाची विक्री होत असून नायलॉन मांजा मुळे निसर्गाची हानी होते. पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर केल्यामुळे पशुपक्ष्यांचे नव्हे तर माणसांचेही गळे चिरल्याच्या अनेक घटना समोर येतात त्यामुळे नायलॉन मांजाची विक्री व वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सर्वपक्षीय पदाधिकारी, तथा येवला व्यापारी महासंघ यांच्या वतीने शहर पोलिसांकडे केली आहे.

### हिवाळ्यामुळे उबदार कपड्यांची मागणी वाढली



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : हिवाळा सुरू होताच बाजारपेठांमध्ये उबदार कपड्यांची मागणी झपाट्याने वाढू लागली आहे. वाशी येथील मिनी मार्केटमध्ये थंडीपासून बचाव करणाऱ्या कपड्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांची गर्दी पाहता दुकानदारांना यंदाचा हिवाळा विक्रीसाठी फायदेशीर ठरणार असल्याचे दिसत आहे. दुकानदारांच्या मते स्वेटर, टोपी, कानटोपी, जॅकेट्स यांसारख्या विविध प्रकारच्या उबदार कपड्यांना जास्त मागणी आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सगळ्यांसाठी आवश्यक कपडे बाजारात उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे, मागील वर्षाच्या तुलनेत यंदा या कपड्यांच्या किंमती काही प्रमाणात कमी झाल्या आहेत. ग्राहकांसाठी ६५० रुपये रेंजपासून विविध प्रकारचे फॅन्सी उबदार कपडे बाजारात उपलब्ध आहेत.

### टेलिग्रामवरून एका तरुणाला घातला लाखोंचा गंडा; सायबर पोलिसांच्या मदतीने रक्कम मिळाली परत





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री येथील एका तरुणाची काही भामट्यांनी तब्बल लाखो रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. टेलिग्रामच्या माध्यमातून ही फसवणूक करण्यात आली. टेलिग्रामवर काही तासात पैसे दुप्पट करुन देतो अशी जाहिरात आली होती. या जाहिरातीमधीव अमिषाला फिर्यादी करुन बळी पडला. या तरुणाने ज्याने जाहिरात दिली होती त्याला ऑनलाईन पैसे पाठवले, वेळोवेळी वेगवेगळी कारणं सांगून या तरुणाकडून फसवणाऱ्याने एकूण ५ लाख ६२ हजार ४०० रुपये घेत त्याची फसवणूक केली. त्यानंतर तरुणाने सायबर पोलिसांना याबाबत तक्रार केली. सायबर पोलिसांनी वेळीच ट्रान्सफर झालेली सर्व रक्कम परत मूळ मालकाला मिळवून दिली आहे. कोणत्याही अमिषाला बळी पडू नये, अन्यथा आपली फसवणूक होऊ शकते व असा काही प्रकार झाल्यास त्वरीत सायबर पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.



### छ. संभाजीनगर शहरात फेंगल चक्रीवादळामुळे थंडीचे प्रमाण कमी; हवामान तज्ञांनी दिली माहिती





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** :बंगालच्या उपसागरात फेंगल चक्रीवादळाचा परिणाम मराठवाड्यावर झाला आहे. छ.संभाजीनगर शहरात मागील दोन दिवस ढगाळ वातावरण आहे, त्यामुळे थंडीचा कडाका जसा पडला पाहिजे तसा पडत नाही आहे. फेंगल चक्रीवादळामुळे थंडी कमी झाली आहे. ढगाळ वातावरण असलं तरी मराठवाड्यात पाऊस पडण्याची शक्यता कमी आहे. दोन-तीन दिवस थंडीचे प्रमाण कमी असेल मात्र दोन-तीन दिवसानंतर थंडीचं प्रमाण वाढू शकतं असे हवामान तज्ञ श्रीनिवास औंधकरयांनीसांगितलं आहे.

# समीर भुजबळांनंतर सुहास कांदेंचं नेक्स्ट टार्गेट छगन भुजबळ?

## नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून वादाचा नवा ड्रामा सुरु

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** :एकीकडे महायुतीत सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. तर दुसरीकडे नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीतील नेत्यांमध्ये चढाओढ सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे पालकमंत्रिपदासाठी आग्रही असतानाच शिवसेना शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांच्या समर्थकांकडून सुहास कांदे भावी पालकमंत्री असे बॅनर लावले. यामुळे पालकमंत्रिपदावरून सुहास कांदे आणि भुजबळ वादाचा नवा अंक सुरु झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.





सत्ता स्थापनेच्या आधीच नाशिकमध्ये पालकमंत्रिपदावरून बॅनरबाजी सुरु आहे. एकीकडे सुहास कांदे यांच्या समर्थकांकडून बॅनर झळकले असतानाच छगन भुजबळांचा भावी पालकमंत्री, अशा आशयाचा नाशिक शहरात बॅनर लागला. तसेच छगन भुजबळ हे नाशिकचे पालकमंत्री व्हावे, यासाठी युवक राष्ट्रवादीने काल महादेव मंदिरात दुग्ध अभिषेक केला होता.

भुजबळ आणि कांदे यांचे बॅनर झळकल्याने नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून पुन्हा एकदा भुजबळ आणि कांदे आमने-सामने आल्याचे दिसून येत आहे. महायुतीतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटातील कार्यकर्त्यांमध्ये आपल्याच नेत्याला पालकमंत्रीपद मिळावे यासाठी संघर्ष पाहायला मिळत आहे. सुहास कांदे यांनी छगन भुजबळांचे पुतणे समीर भुजबळ यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव केल्यानंतर कांदे यांचे पुढचे टार्गेट छगन भुजबळ आहे का? पालकमंत्री पदावरून सुहास कांदे आणि भुजबळ वादाचा नवा अंक पाहायला मिळणार का? अशा चर्चांना नाशिकमध्ये उधाण आले आहे.

नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात देवयानी फरांदे या तिसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे वसंत गीते यांचा देवयानी फरांदे यांनी पराभव केलाय. यानंतर आता देवयानी फरांदे यांचे भावी पालकमंत्री असे बॅनर दिसून आले आहे. नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी गिरीश महाजन, छगन भुजबळ, दादा भुसे यांचे नाव चर्चेत असतानाच देवयानी फरांदे यांचे बॅनर झळकल्याने राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. आता देवयानी फरांदे यांची मंत्रीपदी वर्णी लागणार का? नाशिकच्या पालकमंत्रीपदी कोणाची निवड होणार? याकडे नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

## गोव्यात भारतीय नौदलाच्या पाणबुडीला मासेमारी करणाऱ्या बोटीची जोरदार धडक, २ खलाशांचा जागीच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : नौसेनेच्या पाणबुडीला मासेमारी बोटीची धडक बसून २१ नोव्हेंबरला झालेल्या अपघातप्रकरणी आता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोव्याच्या समुद्राजवळ झालेल्या नौसेनेच्या पाणबुडी अपघातात मासेमारी बोटीवरील दोन खलाशांचा मृत्यू झाला होता. या अपघातात नौसेनाच्या पाणबुडीचं देखील कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे. या प्रकरणी मासेमारी बोटीवरील तांडेलविरोधात यलो गेट पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कर्नाटक येथील कारवार बंदरातून भारतीय नौसेनेची आय.एन.एस. करंजा ही पाणबुडी २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास पैरीस्कोप डेप्थ मेंटेन करुन गोव्याच्या तटावरुन वेगाने जात होती. दरम्यान पाणबुडीच्या उजव्या बाजूने एफ. व्ही. मारथोमा ही एक मासेमारी बोट दोन ते तीन किलोमीटर अंतरावर दिसून आली, सदर मासेमारी बोट एका जागेवर उभी होती. प्रकाश फार अंधुक असल्यामुळे समोरची बोट स्पष्ट दिसत नव्हती.

दोन्ही बोटींमध्ये सुरक्षित अंतर राखून एन.एस. करंजा पाणबुडीने दिशा बदलून आपला वेग कायम ठेवला. पाणबुडीने मासेमारी बोटीपासून वाचण्याचे सर्व प्रयत्न करुनही ती मासेमारी बोट पाणबुडीला धडकली आणि समुद्रात पलटी होऊन बुडाली. ही धडक गोव्याजवळील अरबी समुद्रात रात्रीच्या सुमारास झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातात मासेमारी बोटीवरील २ खलाशांचा मृत्यू झाला. या अपघातात बेपत्ता झालेल्या खलाशांचा मृतदेह २८ नोव्हेंबरला सापडला. यानंतर हे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेऊन जेजे रुग्णालयात पाठवले असून मृतदेहाची ओळख पटवण्यात येत आहे.

भारतीय नौसेनेचे कार्यकारी अधिकारी कमल प्रीत यांनी दिलेल्या माहितीनुसार, मासेमारी बोट ऑटोमेटीक आयडेन्टीफिकेशन सिस्टम काम करत नव्हते. त्यामुळे मासेमारी नौकेचा वेग, स्थान, दिशा, नाव समजून येत नव्हते. एफ. व्ही. मारथोमा या बुडालेल्या बोटीवरील दोन हरवलेल्या खलाशांची शोध मोहिम राबवताना दोन्हीही खलाशांचे मृतदेह मिळून आले. या अपघातात नौसेनेच्या पाणबुडीचे जवळपास १० कोटी रुपयांचे नुकसान झाले. ११ खलाशांच्या दुखपतीला आणि दोन खलाशांच्या मृत्यूला कारणीभूत असल्यामुळे मासेमारी बोटीवरील तांडेल विरुद्ध यलो गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी

### मुंबई गोवा महामार्गावरील परशुराम घाटात पाच वाहनांचा अपघात; घरदा कंपनीचे वीस कामगार जखमी

**चिपळूण/प्रतिनिधी** : मुंबई गोवा महामार्गावरील खेड परशुराम घाटात पुन्हा एकदा पाच वाहनांचा अपघात घडल्याने दोन तास वाहातूक बंद ठेवण्यात आली. पाच वाहने एकमेकांवर आदळून हा अपघात झाला. गोव्याकडे जाणाऱ्या कंटेनरने घरडा बसला धडक दिली. या अपघातात घरडा कंपनीच्या बसमधील पंधरा ते वीस कर्मचारी जखमी झाले. हा अपघात मंगळवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडला.

परशुराम घाटात ज्या ठिकाणी संरक्षणभिंत कोसळल्या ठिकाणी एकेरी वाहतूक सुरु आहे. मात्र आज दुपारी दोन वाजता चिपळूण शहरातून घरडा कंपनीचे कर्मचारी घेऊन बस कंपनीकडे निघाली होती. परशुराम घाटात ही बस एकेरी मार्गावर आली असताना समोरून गोव्याकडे जाणारा कंटेनर वेगाने येऊन बसवर आदळला. कंटेनरच्या धडकेने बस लावलेल्या गर्डरवर जाऊन आदळली. तर कंटेनरच्या मागे असणाऱ्या आयशर टेम्पोवर कंटेनर पलटी झाला. घरडा कंपनीच्या बसच्या मागे एक कार आणि त्या मागे एक ट्रक होता. बसच्या मागे असणाऱ्या गाड्या एकमेकांवर आदल्या.

घरडा कंपनीच्या गाडीत असणारे घरडाचे कर्मचारी या अपघातामध्ये जखमी झाले आहेत. किमान पंधरा ते वीस कर्मचारी या अपघातात किरकोळ जखमी झाले आहेत. त्याच्यावर उपचार करण्यात येत आहेत. खाजगी बस आणि कंटेनर यांच्यातील अपघातानंतर या मार्गावरची वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.

### नादुरुस्त जलशुद्धीकरण यंत्र दुरुस्त करा ; मेहकर पंचायत समितीच्या ग्रामपंचायतींना सुचना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायत क्षेत्रात बसविण्यात आलेले जलशुद्धीकरण यंत्र नादुरुस्त असून ते दुरुस्त करून नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करावा, याबाबत महाराष्ट्र गरीबग्रेड संघटना बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांनी दि.२९ नोव्हेंबर २०२४ मेहकर पंचायत समितीला निवेदन दिले होते. या निवदेनाची दखल घेत मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी सर्व ग्रामपंचायतींना नादुरुस्त यंत्र दुरुस्त करून शद्ध पाण्याचा पुरवठा करण्याच्या सुचना दि.२ डिसेंबर २०२४ रोजी केल्या आहेत.

मेहकर पंचायत समितीच्या वतीने मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायतींना दिलेल्या सुचनापत्रात नमुद केले आहे की, महाराष्ट्र गरीबग्रेड संघटना बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांनी तालुक्यातील ग्रामपंचायत क्षेत्रात बसविण्यात आलेले जलशुद्धीकरण यंत्र नादुरुस्त असल्याने गावास अशुद्ध पाणीपुरवठा होत असून यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नमुद केले आहे. तरी आपल्या अनिधस्त ग्रामपंचायत क्षेत्रात बसविण्यात आलेले जलशुद्धीकरण यंत्र नादुर्सत असल्यास दुरुस्त करून केलेल्या कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. याबाबत बुलढाणा जिल्हाधिकारी, बुलढाणा जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी, मेहकर पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक, महाराष्ट्र गरीबग्रेड संघटना बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांना माहितीस्तव सादर करण्यात आल्या आहेत.

## चोपडा तालुक्यात हरभरा व मक्याच्या क्षेत्रात वाढ; रब्बी ज्वारीच क्षेत्र घटलं कृषी विभागाची माहिती






दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : चोपडा तालुक्यात यावर्षी सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडला असल्याने रब्बीच्या पेरणीत हरभरा व मक्याच्या लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. तर रब्बी ज्वारीच्या पेरणी क्षेत्रात घट झाली आहे. सध्या ढगाळ वातावरण असल्याने पिकांवर अळीचा प्रादुर्भाव व रोगराईसाठी पोषक वातावरण आहे. यासाठी शेतकऱ्यांनी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व पिकावर रोगराई पडू नये यासाठी कीटकनाशक, बुरशीनाशक व निंबोळी अर्क चे फवारणी करावी. जेणेकरून वातावरणाचा परिणाम पिकांवर होणार नाही असे आवाहन शेतकऱ्यांना कृषी उपविभागीय अधिकारी अंमळनेर सि डी साठे यांनी केले आहे.

# ५ डिसेंबरला बुलढाण्यात जिल्हास्तरीय युवा महोत्सव


### युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र 'मेरा युवा भारत' यांच्या संयुक्त विद्यामाने गुरुवार, दि. ५ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील युवक-युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या महोत्सवात समूह लोकनृत्य, समूह गीत, कविता लेखन, कथालेखन, मोबाईल फोटोग्राफी, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व विज्ञान मेळावा (समूह व वैयक्तिक) युथ आयकॉन आदींचे आयोजन करण्यात आले आहे. यातील विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षीस, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यातील समूह लोकनृत्यासाठी प्रथम बक्षीस ७००० रुपये, द्वितीय ५००० रुपये व तृतीय ३००० रुपये, समूह लोकगीतासाठी प्रथम बक्षीस ५००० रुपये, द्वितीय ३००० रुपये व तृतीय २५०० रुपये, कविता लेखन व मोबाईल फोटोग्राफी स्पर्धेकरीता प्रथम बक्षीस २५०० रुपये, द्वितीय १५०० रुपये व तृतीय १००० रुपये, कथा लेखनासाठी प्रथम बक्षीस ३००० रुपये, द्वितीय २००० रुपये व तृतीय १५०० रुपये, चित्रकला स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५००० रुपये, द्वितीय ३००० रुपये व तृतीय २००० रुपये, वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५००० रुपये, द्वितीय २५०० रुपये व तृतीय १५०० रुपये, विज्ञान मेळाव्यासाठी (समूह) प्रथम बक्षीस ७००० रुपये, द्वितीय ५००० रुपये व तृतीय ३००० रुपये व विज्ञान मेळाव्यासाठी (वैयक्तिक) प्रथम बक्षीस ३००० रुपये, द्वितीय २००० रुपये व तृतीय १५०० रुपये या प्रमाणे बक्षीस देण्यात येणार आहे.

यामधील विज्ञान मेळावा ही स्पर्धा राजर्षि शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या महोत्सवात युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र, बुलढाणातर्फे करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरीता क्रीडा अधिकारी रविंद्र धारपवार (९९७०११८७९७) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विविध वृत्त...

### अंचरवाडीत आढळलेले हवामान यंत्र हे प्रादेशिक हवामान केंद्राचे !



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : चिखली तालुक्यातील अंचरवाडी येथे शेतात आढळलेले कोरीयन भाषेतील हवामान यंत्र हे प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांचे असून हवामानाच्या अभ्यासाकरीता नियमितपणे परीक्षणासाठी सोडण्यात आले होते. सदर यंत्रामुळे कोणत्याही प्रकारची वित्त व जीवितहानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सोमवार, दि. २ डिसेंबर रोजी अंचरवाडी ता. चिखली येथील व्दारकाबाई सिताराम परीहार व संजय सिताराम परीहार यांच्या शेतामध्ये कोरियन भाषेमध्ये लिहीलेला फुगा व दोरा अशा प्रकारचे हवामान यंत्र आढळून आले होते. या घटनेचा पंचनामा तहसीलदार चिखली यांनी केला असून हे यंत्र प्रादेशिक हवामान केंद्र नागपूर यांचे असल्याचे निदर्शनास आले. या यंत्रामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, असा अहवाल तहसीलदार चिखली यांनी दिला आहे. तसेच सदर हवामान यंत्र ताब्यात घेण्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत सहायक संचालक, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

हवामान तपासण्याकरीता प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांच्याकडून हवामान यंत्र नियमितपणे अवकाशात सोडले जातात. सदर हवामान यंत्र हे कोरियन निर्मितीचे आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारचे हवामान यंत्र आढळून आल्यास स्थानिक प्रशासन व जिल्हा प्रशासनाला कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग बांधवांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली आहेत. आंध्रप्रदेश मध्ये ज्याप्रमाणे तेथील मुख्यमंत्र्यांनी दिव्यांग बांधवांना सहा हजार रुपये लागू केले आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारने देखील सहा हजार रुपये लागू करावे, जिल्हा दिव्यांगाची टक्केवारी न लावता सरसकट किमान ४०% दिव्यांग असलेल्या व्यक्तींना संबंधित संस्थांच्या स्व उत्पन्नातून पाच टक्के निधी वाटप करण्याचे सक्त निर्देश देण्यात यावे यासह अन्य मागण्यांसाठी दिव्यांग बांधवांनी निदर्शने करत आपल्या मागण्या तात्काळ मान्य कराव्या अशी विनंती केली आहे.

### शेलसूर येथे श्री शिवाजी विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या नेहरु युवा केंद्र, बुलडाणा मेरा युवा भारत व श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत श्री शिवाजी विद्यालयाच्या परिसरात २८ नोव्हेंबर रोजी वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी संग्राम देखमुख, विवेक पवार, प्राचार्य डी.एम. कापसे, एस.एम. केसकर, व्ही.आर. घ्याळ, पी जी. खरात, आर.वाय. जाधव, जे.पी. सोनाळकर उपस्थित होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी आईच्या सन्मानार्थ प्रत्येकी एक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याची प्रतिज्ञा घेतली.

### ट्रॅक्टर विहिरीत कोसळून तीन बालकांचा बुडून मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** : ऊसतोड मजुरांची ट्रॅक्टर ट्रॉली शेतातील विहिरीत कोसळून ऊसतोड मजुरांची तीन बालके मृत्युमुखी पडली. माढा तालुक्यातील शिंगेवाडी शिवारात सकाळी ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त ट्रॅक्टर नेहमीच्या चालकाऐवजी ऊसतोड मजूर टोळीचा मुकादम चालवत होता. त्याच्यावर कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अपघातातील तिन्ही मुलांचे पालक नंदूरबार जिल्ह्यातील आहेत. रिंकू सुकलाल वसावी (वय ३), नीतेश शिवा वसावी (वय ३) आणि आरव पाडवी (वय ४) अशी मृत बालकांची नावे आहेत. हयगयीने, अविचाराने, धोकादायकरीत्या ट्रॅक्टर चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी ऊसतोड मजुरांचा मुकादम खिमजी जालम्या तडवी याच्याविरुद्ध ऊसतोड मजूर सुखलाल करपा वसावी (रा. पिंपळवाडी, ता. धडगाव, जि. नंदूरबार) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.

# शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारची 'ॲग्रिस्टॅक' योजना

## राज्यात १६ डिसेंबरपासून मोहिमेला होणार सुरुवात

**- गावनिहाय होणार शिबिराचे आयोजन**
**- शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र शासनामार्फत कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येणार आहे. येत्या १६ डिसेंबरपासून या योजनेंतर्गत विशेष मोहिमेला राज्यभरात सुरुवात करण्यात येणार आहे. या मोहिमेत गावनिहाय शिबिरांचे आयोजन केले जाणार असून शेतकऱ्यांनी शिबिरात सहभागी होवून नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून ॲग्रिस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी स्थापित केलेले फाऊंडेशन आहे. या आशादायक व दूरगामी परिणाम करणाऱ्या ॲग्रिस्टॅक योजनेची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात कालबध्द पध्दतीने करण्याचे महाराष्ट्र शासनाने निश्चित केले आहे.



या ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतीची आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येणार आहे. याद्वारे उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरण ची आवश्यकता राहणार नाही.

या योजनेंतर्गत १६ डिसेंबरपासून प्रत्येक तालुक्यात मोहीमेला सुरुवात करण्यात येणार आहे. या करीता गावनिहाय शिबीर आयोजित करण्यात येणार असून ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांचे पथक गावात उपस्थित राहणार आहेत. त्यांचे तालुकास्तरीय वेळापत्रक संबंधित तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

सर्व शेतकऱ्यांनी गावनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या शिबीरात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. तसेच शेतकऱ्यांना https://mhfr.agristack.gov.in/ या लिंकचा वापर करुन स्वतः नोंदणी करता येणार आहे. केंद्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी ॲग्रिस्टॅक योजनेचा लाभ सर्व शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ करीता अर्ज सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्फत जिल्ह्यातील उत्कृष्ठ क्रीडापटू, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत क्रीडा कार्यकर्ता यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होवून त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा संघटक कार्यकर्ता आणि गुणवंत खेळाडू (पुरुष व महिला) यांना यावर्षी प्रजासत्ताक दिनी जिल्हा क्रीड पुरस्काराचे वितरण करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम रु.१०,०००/- असे आहे. त्या अनुषंगाने सन २०२३-२४ च्या पुरस्कारासाठी या कार्यालयामार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.




पुरस्काराचे निकष : (१) पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असले पाहिजे, (२) क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्षे महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्याने वयाची ३० वों पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. गुणांकनाकरीता त्या जिल्ह्यातील खेळाडूंचीच कामगिरी ग्राह्य धरली जाईल. गुणांकणाकरीता त्या जिल्ह्यातील कामगिरी ग्राह्य धरली जाईल. (३) खेळाडूने व दिव्यांग खेळाडुने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ५ वर्षापैकी २ वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. (४) एका जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. (५) एकदा एका खेळामध्ये किंवा एका प्रवर्गामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळण्यास पात्र असणार नाही.

पुरस्कार वर्षाची गणना १ जुलै ते ३० जुन असे राहील. उपरोक्त तिनही पुरस्काराकरीता अर्जासोबत सादर करण्यात आलेले प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे पुन्हा पुन्हा (अनेकवेळा) सादर करु नयेत. अर्जदाराने सादर केलेले कागदपत्रे व प्रमाणपत्र सत्य असलयाबाबतचे संबंधित तहसिलदार यांचेकडून फीडीवेट करुन घ्यावे.

विहीत नमुन्यातील अर्ज आणि पुरस्काराच्या अटी व शर्ती आणि अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत अर्ज प्राप्त करुन घेवुन सदरचे परिपुर्ण सिल बंद अर्ज दि.२० डिसेंबर २०२४ पर्यंत या कार्यालयास सादर करावेत. विहीत मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी असे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.बाळकृष्ण महानकर यांनी कळविले आहे.

## सुशासनतंर्गत ग्रामपंचायती १० ते ५ वाजेपर्यंत सुरू ठेवा; गटविकास अधिकारी यांच्या ग्रामपंचायतींना सुचना

**मेहकर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेच्या मागणीची दखल मेहकर. मेहकर पंचायत समिती अंतर्गत येणार्या सर्व ग्रामपंचायत सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याबाबत महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेच्या दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजी निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याच्या सुचना दि.२ डिसेंबर २०२४ रोजी दिल्या आहेत.

महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटने प्रमुख दिलीप गायकवाड यांनी मेहकर पंचायत समितीला तालुक्यातील ग्रामपंचायत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यरत ठेवून ग्रामपंचायत अधिकारी यांना ग्रामपंचायत कार्यालयात पूर्ववेळ उपस्थित राहत नसल्याबाबत निवेदन मेहकर पंचायत समितीला दिले दिले होते.

या निवेदनाची दखल घेत निवेदनानुसार मेहकर पंचायत समितीतंर्गत येणार्या सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी दररोज कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात हजर रहावे व एकपेक्षा जास्त ग्रामपंचायतीचा प्रभार असणार्या ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपचांयतीच्या दर्शनी भागावर ग्रामपंचायत भेटीचे दिवस व वेळ ठळक अक्षरात लिहावे,अशा सुचना तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दिल्या आहेत.

निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हाधिकारी,बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,मेहकर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक व महाराष्ट्र गरीबग्रेड संघटना प्रमुख दिलीप गायकवाड यांना माहितीस्तव सादर करण्यात आली आहे.

## ९ डिसेंबर रोजी डाक अदालत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक व आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करुन प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देतांना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की, ज्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ह्या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी अधीक्षक डाक घर, बुलडाणा विभाग, बुलडाणा ४४३००१ व्दारा सोमवार, दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता अधीक्षक बुलडाणा डाक विभाग यांच्या कार्यालयामध्ये डाक अदालत आयोजित करण्यात येत आहे.

पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दलच्या ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतमध्ये दखल घेतली जाईल. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक व मनीऑर्डर बाबतच्या तक्रारी विचार घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रारी पाठविली असेल त्याचे नाव, हुद्दा इत्यादी. संबंधित डाक सेवेबाबतची आपली तक्रार बुलडाणा डाक विभागाचे अधीक्षक गणेश अंभोरे यांच्या नावे दोन प्रतीसह शुक्रवार, दि. ६ डिसेंबर २०२४ पर्यंत अथवा तत्पूर्वी पोहचेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आपल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, असे बुलडाणा डाकघर विभागाचे अधीक्षक गणेश अंभोरे यांनी कळविले आहे.

## नवीन रुपात ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲप १ डिसेंबर २०२४ पासून संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : रब्बी हंगाम १ डिसेंबर २०२४ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरु होत असून शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई-पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. परंतू आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे त्यामध्ये काही तांत्रिक दुरुस्ती करुन नवीन रुपात ई-पीक पाहणी ऊउड उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. यानंतर १०० टक्के पीक पाहणी नवीन सुधारित ई-पीक पाहणी ऊउड मोबाईल ॲप व्दारे संपूर्ण महाराष्ट्रात होणार आहे.



शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल ॲप व्दारे नोंदवायचे व उर्वरित पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदविलेली नाही ते तलाठी यांच्या मार्फत होत असायची. त्यामध्ये दुरुस्ती करुन शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहाय्यक यांची नेमणूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी १ सहाय्यक उपलब्ध राहणार असून सहाय्यक मार्फत पीक नोंदणी होणार आहे.

पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲप मध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे. नवीन मोबाईल प मधील आवश्यकतेनुसार पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे. पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक आहे.

सुधारीत मोबाईल ॲप मधील नविन सुविधेनुसार शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरु होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहाय्यक उपलब्ध असेल. सर्व शेतकऱ्यांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी** : डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत आरेगाव नजदीक गौण खनिजाचे अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर तहसीलदार यांच्या पथकाने कारवाई करून ट्रॅक्टर ताब्यात घेतला. ही कारवाई दि.२ डिसेंबर रोजी रात्री ११.४० मिनिटांनी करण्यात आली. या कारवाईन मात्र अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनसार आरेगाव परिसरात गौण खनिजाचे अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती तहसीलदार रावळकर यांना मिळाली, या माहिच्या आधारे तहसीलदार रावळकर, मंडळाधिकारी चंनखोरे यांनी पाळत राखत आरेगाव परिसरात विना परवाना एक ब्रॉस गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या नस्मीन खॉं उस्मान खॉं यांच्या मालकीचा एम.एच.२८ बी.डब्ल्यू.२५१५ या क्रमांकाच्या ट्रॅक्टर आढळून आला.सदर ट्रॅक्टरवर कारवाई करून एक ब्रॉस गौण खनिजासह ट्रॅक्टर ताब्यात घेऊन सदर ट्रॅक्टर डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आला आहे.







### डोणगाव परिसरात अवैध धंद्यांना उधाण, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

डोणगाव परिसरात मागील अनेक महिन्यापासून अवैध धंदे खुलेआम सुरू असून याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने हे अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न जनतेमध्ये निर्माण होत आहे. डोणगाव परिसरात वरली, मटका, जुगार, यासह अवैधरीत्या दारूविक्री, गौण खनिज वाहतूक आदी अनेक अवैधधंदे खुलेआम सुरू आहेत. याकडे मात्र पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. हा सर्व प्रकार पोलीस प्रशासनाच्या समोर सुरू असतानाही याकडे दुर्लक्ष करून कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून हे अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न या निमित्ताने सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.